पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १५३ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.०१ मार्च, २०२३ दुपारी ०३:०० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १५३ वी बैठक बुधवार, दि. ०१ मार्च, २०२३ रोजी दुपारी ०३:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती / अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश दत्तात्रय गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १७) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | सीए श्रेणिक हुकुमचंद शहा वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

**विषय क्र.१ अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## प्रश्नोत्तरे

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

॥ विद्यया संपन्नता ॥

### अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| श्री. अजितकुमार बापुराव संगवे | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे |
|---|---|
| प्रश्न १ | जोपर्यंत सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म जनरेट होत नाहीत, तोपर्यंत परीक्षा फॉर्म भरण्याचे वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | वरील प्रश्नाचा अर्थबोध होत नाही. |
| प्रश्न २ | जोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होत नाहीत, तोपर्यंत संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेत अंतिम वेळापत्रक परीक्षा विभाग जाहीर करु शकत नाही का? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | प्रस्तुत विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार अंतिम वेळापत्रक प्रसिध्द झाल्यानंतरच संबंधित अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे परीक्षा हॉल तिकीट जनरेट होतात. |

| डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार |
|---|---|
| प्रश्न ३ | विद्यापीठाच्या केसेससाठी नियुक्तीचे निकष व वकिलांची फी देण्यासाठी कोणते नियम लावले जातात व प्रत्येक केससाठी किती फी देणे अभिप्रेत आहे? [कायदा विभाग] |
| उत्तर | विद्यापीठ केसेससाठी व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार विविध न्यायालयात कामकाज पाहण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पॅनल ॲडव्होकेटपैकी वकीलांचे नामनिर्देशन मा. कुलगुरु यांनी केल्यानंतर नियुक्ती करण्यात येवून विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार संबंधित वकीलांना फी अदा करण्यात येते. तसेच पॅनल बाहेरील वकील नेमण्याबाबत मा. कुलगुरु यांनी केलेल्या नामनिर्देशनानुसार संबंधित वकीलांना नेमण्यात येवून मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने फी अदा करण्यात येते. |
| प्रश्न ४ | राष्ट्रहिताच्या दृष्टीने एप्रिल २०१८ ते फेब्रुवारी २०२३ या कालावधीमध्ये विद्यापीठात आयोजित व्याख्यानमाला साठी आमंत्रित वक्त्यांच्या निमंत्रणासाठी कोणते निकष लावले आहेत व त्यासाठी आलेला एकूण खर्च किती? [व्याख्यानमाला विभाग] |
| उत्तर | विविध देणगीदार यांच्याकडून प्राप्त देणगीवरील दरवर्षी मिळणाऱ्या व्याजातून विद्यापीठ व देणगीदार यांच्यातील करारानुसार गठीत समितीच्या शिफारशीन्वये व्याख्यात्यांना निमंत्रित केले जाते. त्यासाठी आलेला एकूण खर्च ₹१,२६,६९७/-. |

| डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे |
|---|---|
| प्रश्न ५ | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता या पदाच्या भरती प्रक्रियेत मुलाखत झाल्यानंतर “Not Suitable Candidate” अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होण्याची कारणे कोणती आहेत? [आस्थापना विभाग] |
| उत्तर | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता या पदाच्या दि.०७/१२/२०२२ रोजीच्या मुलाखतीसाठी उपस्थित असलेल्या दोन उमेदवारांच्या मुलाखतीनंतर निवड समितीने त्यांच्या अहवालात No Candidate is selected असा शेरा दिलेला आहे. |

| श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | डॉ. समाधान दिगंबर पवार |
|---|---|
| प्रश्न ६ | विद्यमान कुलगुरुंच्या काळात विद्यापीठात किती नवीन PG कोर्स सुरु झाले? [आस्थापना विभाग] |
| उत्तर | विद्यमान कुलगुरुंच्या काळात विद्यापीठात एकूण २५ नवीन PG कोर्सेस सुरु झाले. |
| प्रश्न ७ | चालू शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) त्यातील किती कोर्सला प्रवेश नाहीत म्हणून स्थगित केले आहेत? [आस्थापना विभाग] |
| उत्तर | चालू शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) प्रवेश नाहीत म्हणून स्थगित केलेल्या कोर्सची संख्या निरंक आहे. |
| प्रश्न ८ | त्यातील जे कोर्स सुरु आहेत त्याला या वर्षी किती प्रवेश झाले आहेत व त्याची प्रवेश क्षमता किती आहे व या कोर्सला शासन मान्यता कधी मिळणार, जेणेकरुन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळेल? [आस्थापना विभाग] |
| उत्तर | सदर कोर्सेसकरिता प्रवेश क्षमता व यावर्षी प्रवेशित झालेले विद्यार्थी यांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र ६)** शासनाला याबाबतीत वारंवार पाठपुरावा करण्यात येत आहे. याची दखल घेवून मा. संचालक, उच्च शिक्षण पुणे यांनी त्यांच्या दि.०६/१२/२०२२ रोजीच्या पत्रानुसार वरील अभ्यासक्रमांची शिफारस शासन मान्यता मिळणेकामी मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना केली आहे. **(सहपत्र ७ ते ९)** शासन स्तरावर सदरबाबत कार्यवाही सुरु आहे. त्यास मान्यता मिळताच प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप मिळणेकामी योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

| ॲड. उषा नंदकुमार पवार | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
|---|---|
| प्रश्न ९ | विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्यांना विद्यापीठामध्ये कार्यालय देणेबाबत कायदेशीर तरतूद आहे काय? [सभा व निवडणूका विभाग] |
| उत्तर | नाही. |

| श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले |
|---|---|
| प्रश्न १० | नवीन शैक्षणिक धोरण पुढील शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यासाठी विद्यापीठाने काय तयारी केली आहे? [अभ्यासमंडळे विभाग] |
| उत्तर | मा. कुलगुरुमहोदयांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाचे प्र-कुलगुरु, चारही विद्याशाखांचे प्र.अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांची बैठक घेवून सदर बैठकीमध्ये नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये विविध अभ्यासक्रम तयार करण्यासाठी चार वर्षाचा सुधारित आराखडा तयार करण्यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले व त्यांनी तयार केलेले आराखडे तत्कालीन अभ्यासमंडळांचे अध्यक्ष व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांच्या समवेत घेण्यात आलेल्या बैठकीसमोर मांडण्यात आले.<br>सदर तयार करण्यात आलेले आराखडे शासनाकडून गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीच्या दि.२७/०२/२०२३ रोजीच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे होणाऱ्या सुकाणू समितीच्या दुसऱ्या बैठकीसमोर मांडण्यात येणार आहेत. |

| श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले |
|---|---|

| | |
|---|---|
| प्रश्न ११ | सोलापूर विद्यापीठामधून दुसऱ्या विद्यापीठामध्ये पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतल्यानंतर शेवटच्या वर्षाच्या मार्कशीटचे व्हेरिफिकेशन संबंधित विद्यापीठाकडून करावे लागते त्यासाठी इतर विद्यापीठांच्या तुलनेत आपल्या विद्यापीठाची फी का जास्त आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत E-Transript & E-Verification शुल्क आकरण्यासंदर्भात मान्यता दिलेला विषय दि.१३/१२/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. तेव्हा सदरील विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात आलेला आहे. |

| Parameter | Charges | Remark |
|---|---|---|
| Transcript Application Fee | 1,120/- | This is one-time fee. |
| Per E-Transcript Deviverty | 1,300/- | This include electronic delivery to the estination university. |
| Paper Copy | 700/- | --- |
| For Verfication | | |
| Parameter | Charges | Remark |
| Verification Fee | 1,000/- | Approved verification report is sent to Verifier / Employer on email. |

| | |
|---|---|
| ठराव क्र.३० | प्रस्तुत विद्यापीठातंर्गत सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांकरिता E-Transcript & E-Verification शुल्क निश्चितीबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या कार्यवाहीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

वरील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ठराव क्र.३० नुसार विद्यार्थ्यांकडून E-Transcript & E-Verification शुल्क आकारण्यात येते.

| | |
|---|---|
| प्रश्न १२ | आपल्या विद्यापीठामध्ये विद्यार्थीनींना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीच्या धर्तीवर दिव्यांग विद्यार्थ्यांना का शिष्यवृत्ती मिळत नाही? [पात्रता विभाग] |
| उत्तर | विद्यापीठ प्रशासनाने फक्त विद्यापीठ विद्यार्थीनींकरिता "मुली शिकवा, समाज घडवा" ही योजना कार्यान्वित केलेली आहे. |

| डॉ. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे |
|---|---|

| | |
|---|---|
| प्रश्न १३ | प्रस्तुत विद्यापीठाचा एम के सी एल शी असलेला करार रद्द झाल्यानंतर रिझल्ट व डेटा मायग्रेशन संदर्भातील कामासाठी विद्यापीठाकडून ई- निविदा काढलेल्या आहेत काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | नाही. |
| प्रश्न १४ | प्रस्तुत विद्यापीठामार्फत विद्यापीठ कायदा १९९४ ला अनुसरुन तयार करण्यात आलेल्या ऑर्डिनन्स ०.३९ हा नवीन विद्यापीठ कायदा २०१६ अस्तित्वात आल्यानंतरही गोपनिय कामांसाठी वापरला गेला आहे काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | होय. |

| श्री. संजय नामदेव साळुंखे | श्री. सचिन मारुती गायकवाड |
|---|---|
| प्रश्न १५ | विद्यापीठ उपहारगृह बांधकामासाठी व विस्तारासाठी किती खर्च आला होता? [अभियांत्रिकी विभाग] |
| उत्तर | विद्यापीठ उपहारगृह बांधकामासाठी ₹८,२८,७६७/- (सन २००९-१०) व विस्तारासाठी ₹७,८८,११२/- (सन २०१६-१७) इतका खर्च आला आहे. |
| प्रश्न १६ | त्यानंतर केलेल्या विस्तार व दुरुस्तीसाठी एकूण किती खर्च आला? [अभियांत्रिकी विभाग] |
| उत्तर | त्यानंतर केलेल्या विस्तार व दुरुस्तीसाठी रुसा निधी अंतर्गत एकूण खर्च ₹२३,५१,५२३/- (सन २०२१-२२) इतका खर्च आला आहे. |

| श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | डॉ. सिद्राम नारायण सलवदे |
|---|---|
| प्रश्न १७ | विद्यापीठातील एकूण स्किल्स कोर्स किती आहेत व त्यातील किती कोर्सला सध्या एकही विद्यार्थी प्रवेशित नाही? [कौशल्य विकास केंद्र] |
| उत्तर | प्रस्तुत विद्यापीठ कौशल्य विकास केंद्रामार्फत एकूण ४७ संस्था / महाविद्यालय / हॉस्पिटल व संकुले यांच्याशी निगडीत ३ महिन्यांचे बेसिक कोर्सेस, ६ महिन्यांचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम व १ वर्षाचे पदविका असे एकूण - १४२ कोर्सेस प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.<br>विद्यार्थ्यांच्या व उद्योग क्षेत्राच्या मागणीनुसार विविध कोर्सेस सुरु केले जातात. विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या प्रवेश इच्छेनुसार व मागणीनुसार दरवर्षी विविध कोर्सेस चालविले जातात किंवा तात्पुरते स्थगित केले जातात व जर विद्यार्थ्यांनी व संस्थांनी मागणी केल्यास स्थगित केलेले कोर्सेस पुन्हा सुरु केले जातात. प्रवेशासंदर्भात उद्योग क्षेत्राची गरज व विद्यार्थ्यांची मागणी यानुसार लवचिक धोरण स्विकारले आहे. त्यामूळे दरवर्षी सुरु असणाऱ्या कोर्सेसच्या संख्येमध्ये भिन्नता आढळते.<br>सध्या कौशल्य विकास केंद्राशी एकूण ४७ संस्था संलग्न असून एकूण १४२ कोर्सेस प्रस्तावित आहेत. त्यापैकी विद्यार्थी व संस्थेच्या मागणीनुसार विविध ७८ कोर्सेस सुरु आहेत. एकूण ६४ कोर्सेसकरिता विद्यार्थ्यांची मागणी नसल्यामूळे एकही विद्यार्थी प्रवेशित नाही. या सर्व कोर्सेसचे अभ्यासक्रम अद्यावत करुन विद्यार्थ्यांच्या व संस्थेच्या मागणीनुसार त्यांना कोर्सेस कौशल्य विकास केंद्रामार्फत प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध करुन दिले जातात. |
| प्रश्न १८ | अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना सोडून इतर विद्यार्थ्यांना अद्याप मार्कलिस्ट अजून मिळाल्या नाहीत यास जबाबदार कोण? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | परीक्षा व मूल्यमापन विभागातील छपाई विभागाकडून गुणपत्रिकेच्या छपाईची प्रक्रिया पुर्ण केली जाते आणि सदरील छपाई केलेल्या गुणपत्रिका या ज्या त्या कार्यासनाकडे संबंधित महाविद्यालयांना वाटप करण्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जातात.<br>त्यावेळी सदरील छपाई विभागाकडून प्राप्त गुणपत्रिका सत्वर घेवून जाणेबाबत ज्या त्या महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरुन कळविले जाते. त्यावेळी संबंधीत महाविद्यालयाकडून गुणपत्रिका घेवून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावर वाटप करण्याची प्रक्रिया पुर्ण केली जाते.<br>गुणपत्रिका घेवून जाण्याबाबत आजपर्यंत सर्व महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरुन वारंवार कळविण्यात आले आहे. त्यानुसार महाविद्यालयाकडून गुणपत्रिका घेवून जाण्याची कार्यवाही सुरु आहे. |

| श्री. अजिंक्य देशमुख | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे |
|---|---|
| प्रश्न १९ | इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगसाठी BOS च्या निवडणूकीचा निकाल खूप पूर्वी जाहीर झालेला असूनदेखील अद्यापपर्यंत समिती का स्थापन करण्यात आली नाही? [अभ्यासमंडळे विभाग] |
| उत्तर | इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगसाठी BOS समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सर्व समित्यांच्या बरोबर सुरु आहे. |

| अॅड. नीता सुरेशबाबू मंकणी | सीए श्रेणिक हुकुमचंद शहा |
|---|---|
| प्रश्न २० | महाराष्ट्र शासनाच्या व्यतिरिक्त केंद्र सरकारकडून विद्यापीठाला किती अनुदान प्राप्त झाले आहे? [वित्त व लेखा विभाग] |
| उत्तर | १) RUSA (Component No.०३): ₹२०,००,००,०००/-<br>२) RUSA (Component No.०८): ₹९५,०५,८३७/-<br>३) UGC (XII PLAN): ₹४,२०,००,०००/-<br>४) UGC (XI PLAN): ₹२,५०,००,०००/- |
| प्रश्न २१ | सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु बंडगर सर चार्ज घेतेवेळी व कार्यकाळ संपताना किती फंड होता, तसेच माजी कुलगुरु मालदार सर चार्ज घेतेवेळी व कार्यकाळ संपताना किती फंड होता आणि सध्याच्या कुलगुरु चार्ज घेताना व सध्या फेब्रुवारी अखेर किती फंड शिल्लक आहे? [वित्त व लेखा विभाग] |

| उत्तर | नाव | चार्ज घेतेवेळी फंड | कार्यकाळ संपताना फंड |
|---|---|---|---|
| | Dr. Bandgar B. P. | ₹७,७०,२९,६४०/- | ₹३०,९४,४४,४९३/- |
| | Dr. Maldar N. N. | ₹३०,९५,६०,७४३/- | ₹७९,८१,४५,३२३/- |
| | Dr. Fadnavis M. M. | ₹८४,९८,११,७१६/- | ₹१२३,५५,०९,९००/- |

| डॉ. भगवान नागनाथ आदटराव | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील |
|---|---|
| प्रश्न २२ | सन २०२२-२३ मध्ये Changes in Staff approval समितीच्या किती बैठका झाल्या आहेत? [शिक्षक मान्यता विभाग] |
| उत्तर | सन २०२२-२३ मध्ये Changes in Staff approval समितीच्या एकूण ०६ बैठका खालीलप्रमाणे झाल्या आहेत.<br>दि.१८/१०/२०२२ ते १९/१०/२०२२ असे दोन दिवस सकाळी ११:०० ते सायं. ०५:०० वा. पर्यंत.<br>दि.०६/१२/२०२२ ते ०८/१०/२०२२ असे तीन दिवस सकाळी ११:०० ते सायं. ०५:०० वा. पर्यंत.<br>दि.२३/१२/२०२२ एक दिवस सकाळी ११:०० ते सायं. ०५:०० वा. पर्यंत. |

| श्री. सुदर्शन मसु यादव | सीए श्रेणिक हुकुमचंद शहा |
|---|---|
| प्रश्न २३ | विद्यापीठाच्या मागील पाच वर्षाच्या खर्चाचे शासकीय ऑडिट का झाले नाही? [वित्त व लेखा विभाग] |
| उत्तर | सदरची बाब विद्यापीठ प्रशासनाच्या नियंत्रणामधील नाही. |

| श्री. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर |
|---|---|
| प्रश्न २४ | विद्यार्थ्यांच्या प्रवेश ते निकालापर्यत वापरण्यात येणारे MKCL चे सॉफ्टवेअर विद्यापीठाच्या कोणत्या प्राधिकरणाच्या बैठकीत रद्द करण्यात आले? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | दि.२१ मे, २०२१ च्या व्यवस्थापन परिषद बैठकीच्या ठरवानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| प्रश्न २५ | सध्या सुरु असलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका ऑन स्क्रीन evaluation करण्यात येणार आहेत त्याचे सॉफ्टवेअर खरेदीसाठी विद्यापीठाने कोणती प्रक्रिया राबवण्यात आली आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | सदरचे सॉफ्टवेअर विद्यापीठाने खरेदी केलेली नाही. विहीत प्रक्रियेद्वारे सदरचे काम बाह्यस्त्रोत कंपनीकडून करुन घेण्यात येत आहे. |
| प्रश्न २६ | पदवीदान समारंभ होवून ३ महिने होवून गेले तरीही विद्यार्थ्यांना अद्याप सर्टिफिकेट का वितरित केले नाहीत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| उत्तर | प्रस्तुत विद्यापीठाच्या १८ व्या पदवीदान समारंभामध्ये ऑनलाईन अर्ज केलेल्या मार्च / एप्रिल, २०२२ पूर्वी पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची सर्व पदवी प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आलेली आहेत.<br>मार्च / एप्रिल, २०२२ या परीक्षेमध्ये अंतिम सत्रात उर्तीण झालेल्या व पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांचा डाटा / माहिती फोटो व सहसह संगणक विभागाकडील तांत्रिक अडचणीमुळे पदवी प्रमाणपत्र छपाईस उशीर झालेला आहे. |

**विषय क्र.२ नवोपक्रम, नवसंशोधन व साहयर्च मंडळ यांच्यासोबत झालेल्या विविध ०३ (MOU) सामंजस्य करार करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदया यांनी मान्यता दिल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

टिपणी: औद्योगिक व आर्थिक विकासास चालना देण्यासाठी आणि स्टार्ट-अप धोरणाच्या माध्यमातून राज्याच्या आर्थिक प्रगतीमध्ये लक्षणीय योगदान देण्यासाठी आणि समाजातील सर्व घटकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी व उद्योगांना प्रोत्साहन देण्याकरिता "महाराष्ट्र राज्य नाविन्यपुर्ण स्टार्ट-अप धोरण, २०१८" नुसार उपाययोजना करण्यासाठी विद्यार्थी संशोधनकांना व उद्योजकांना त्यांचा संशोधन कार्य व उद्योग वाढवण्यासाठी विविध संस्थेचे सामंजस्य करार करण्यात आलेली आहे. त्या संस्थेची नावे खालीलप्रमाणे आहेत.

1. MAGIC, MIDC Industrial Area, Aurangabad.
2. Institute for Design of Electrical Measuring Instruments (A Govt. of India Society), Mumbai
3. SKIN Sinhgad College of Engineering Pandharpur.

वरीलप्रमाणे ०३ संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली असून, त्याअनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आली आहे.

सदर वरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **नवोपक्रम, नवसंशोधन व साहयर्च मंडळ यांच्यासोबत झालेल्या विविध ०३ (MOU) सामंजस्य करार करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदया यांनी मान्यता दिल्याची नोंद घेण्यात आली.**<br>तसेच विद्यापीठाकडून विविध संस्थाशी सामंजस्य करार करताना सदर करारातून काय साध्य होणार आहे, अपेक्षित फलनिष्पी (outcomes) काय आहे हे पाहण्यासाठी Monitering Committee असावी असे डॉ. अजित पाटणकर यांनी व्यक्त केलेल्या मताला सर्वांनी दुजोरा देवून त्यानुसार यापुढे ज्या विभागामार्फत सामंजस्य करार करण्यात येतील, त्यांनी त्यानुसार Monitoring Committee ची स्थापना करुन त्यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शनात्मक अहवाल घ्यावा असे ठरले. |

**विषय क्र.३ श्री. अनिल बाबुराव जाधव यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव या पदावर दिलेल्या पदोन्नतीस अनुसरुन विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक ४ ला अनुसरुन झालेला ठराव फेरविचारार्थ सादर.**

टिपणी: दि.२०/११/२०१८ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये दि.३०/१०/२०१८ रोजीच्या वित्त व लेखा विभागाच्या टिपणीन्वये मा. महालेखापाल यांनी लेखा परिक्षणातील श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्या पदोन्नतीबाबत उपस्थित केलेल्या आक्षेपाचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देण्यात आले होते.

<table>
<tr><th>Para No.</th><th>Para</th><th>Department Reply</th></tr>
<tr><td>5</td><td>Promotion to the post of Asst. Registrar in contravention to the seniority list of the University</td><td>The meeting of Departmental Promotion committee consisting 1. Prof. Dr. S. V. Lonikar 2. Prin. Dr. B. M. Bhanje 3. Dr. R. B. Bhosale was held on 22/11/2011. The committee considered Shri. D. S. Kamble and Shri A. B. Jadhav for the promotion.
<table>
<tr><th>Shri D.S. Kamble</th><th>Shri A. B. Jadhav</th></tr>
<tr><td>Completed 4 years 4 Months on the post of Section Officer</td><td>1) Completed 2 years 11 Months on the post of Section Officer in Solapur University.<br>2) Completed more than 3 years on the post of Section Officer in Shivaji University, Kolhapur.</td></tr>
</table>
1. The one of condition for promotion to Asst. Registrar as per standard code Rules 1984 Section 3 (ii) (c)-who posses five years experience in class II posts in the Universities.<br>
2. The Departmental Promotion Committee after considering both the cases recommended Shri A. B. Jadhav for promotion on the post of Asst. Registrar (The minutes of said meeting are enclosed herewith)<br>
3. The report of the Departmental Promotion committee who has recommended the Promotion of Shri. A. B. Jadhav will be once again placed before Management Council for review the promotion.</td></tr>
</table>

महालेखापाल कार्यालयाकडून उपस्थित करण्यात आलेला मुद्दा क्र. ५ खालीलप्रमाणे आहे.

- Para No.5 : Promotion to the post of Asst. Registrar in contravention to the seniority list of the University- As per Section 5(11) of the Maharashtra University Act, 1994 the University has a power to create non-teaching skilled, administrative, ministerial and other posts and prescribe the qualifications and pay-scales with prior approval of the State Government. As per rule 14(1) of the slandered code rules 1984 which were applicable to all non-teaching

employees of Non-Agricultural Universities of Maharashtra who were appointed on time scale of pay; the seniority of the employee in a cadre under the University or the College under same management shall be determined on the basis of date of continuous service in that cadre. Further the date of joining the service on probation or as the case may be the date of promotion shall be taken as the date of continuous service for this purpose.

Also, as per Rule 14(6) (a) of the Standard Code, 1984, the employee who requests for change in cadre of equivalent level, the employee shall rank lowest in the seniority in the other cadre.

Scrutiny of seniority list of non-teaching employees for the period of 2008-2009 revealed that Shri. D. S. Kamble (Date of appointment to the post of Superintendent: 28/06/2007) was senior to Shri A. B. Jadhav (Date of appointment to the post of Superintendent: 02/12/2008)

It was observed that the Departmental Promotion Committee had promoted Shri. A.B. Jadhav to the post of Asst. Registrar w.e.f. 16/12/2011 even when Shri. D.S. Kamble was placed higher in the Seniority List of Non-teaching employees of equivalent scale. Also, when there were two positions vacant for General category was not promoted while Shri. Jadhav who belonged to VJNT category was promoted to the post of Asst. Registrar (against vacancy for General category).

In reply, the Registrar stated that the promotion of Shri. A. B. Jadhav was made as per the decision of Departmental Promotion Committee.

The reply is not tenable since the University has not stated (along with supporting documents) why the seniority list was ignored and whether the Departmental Promotion Committee was competent (and under which situations/circumstances) to grant such promotion by ignoring seniority.

दि.२२/११/२०११ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीने केलेली शिफारशी खालीलप्रमाणे आहेत.

- श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम, कक्ष अधिकारी: दि.२२/०३/२०११ व ०५/०५/२०११ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम यांनी शासन परिपत्रक सीबीसी१०/२०१०/प्र.क्र.४७/मावक-५ मंत्रालय विस्तार भवन दि.२५/०३/२०१० अन्वये आवश्यक असलेले जाती वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे कक्ष अधिकारी या पदावर ४ वर्ष ४ महिने २४ दिवस कार्यरत आहेत. त्यामुळे सामान्य प्रशासन परिपत्रक क्रमां. एस.आर. व्ही.२००५/ प्रक्र०१/२००५/१२ दि.२५ फेब्रुवारी २००५ नुसार श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम पदोनतीस पात्र आहेत. तथापि, व्यवस्थापन परिषदेच्या दि.२१/०७/२०११ रोजीच्या बैठकीत झालेल्या ठराव क्र. ०८ नुसार श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम यांचा कक्ष अधिकारी या पदावरील सेवा काल ५ वर्षापेक्षा कमी असल्याने ते पदोन्नतीस पात्र होत नाहीत. तथापि महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे उपरोक्त परिपत्रक बंधनकारक आहे असे वाटते. सबब याबाबत विद्यापीठ प्रशासनाने निर्णय घ्यावा.

* श्री. अनिल बाबुराव जाधव, कक्ष अधिकारी: श्री. अनिल बाबुराव जाधव हे प्रस्तुत विद्यापीठात कक्ष अधिकारी या पदावर २ वर्ष ११ महिने २० दिवस कार्यरत असून यापूर्वी शिवाजी विद्यापीठात अधिक्षक या पदावर ३ वर्षापेक्षा अधिक काळ कार्यरत होते. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कडून त्यांचे सेवापुस्तक, गोपनीय अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यामुळे प्रस्तुत विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठात कक्ष अधिकारी / अधिक्षक पदावरील त्यांचा एकत्रित सेवाकाल विचारात घेता श्री. अनिल बाबुराव जाधव पदोन्नतीस पात्र आहेत. तसेच त्यांचे सन २०१०-११, २००९-१०,२००८-२००९, २००७-२००८, २००६-२००७ वर्षाचे गोपनिय अहवाल विचारात घेता, त्यांना एक चांगले दोन उत्कृष्ट व दोन अत्युत्कृष्ट असे शेरे प्राप्त झाले आहेत. वरील बाबीचा विचार करुन श्री. अनिल बाबुराव जाधव यांना सहायक कुलसचिव खूला प्रवर्ग या पदी पदोन्नती द्यावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी कार्यालयीन निवेदन खालीलप्रमाणे आहे.

१) प्रस्तुत विद्यापीठाकडून सरळ सेवा भरतीकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन श्री. अनिल बाबुराव जाधव यांची विद्यापीठाचे नियुक्ती आदेश क्र. SOL/UTY/ESTT/७७९८-०७, दि.२१/१०/२००८ अन्वये (अधिक्षक) कक्ष अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन श्री. अनिल बाबुराव जाधव हे दि.०२/१२/२००८ रोजी (अधिक्षक) कक्ष अधिकारी या पदावर रूजू झाले होते.

२) तद्नंतर विद्यापीठामध्ये रिक्त असलेल्या सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती देणेकामी खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठीत करण्यात आलेली होती.

    १) प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रस्तुत विद्यापीठ.
    २) प्राचार्य, डॉ. बी. एम. भांजे, व्यवस्थापन परिषद सदस्य, प्रस्तुत विद्यापीठ.
    ३) डॉ. आर. बी. भोसले, सहा. प्राध्यापक, रसायनशास्त्र संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.

३) उपरोक्त विभागीय पदोन्नती समितीची दि. २२/११/२०११ रोजी संपन्न झालेली होती. सदर समितीसमोर सहायक कुलसचिव या पदाकरीता पात्र असणाऱ्या श्री. ज्ञानदेव सितारम कांबळे व श्री. अनिल बाबुराव जाधव यांची संपूर्ण माहिती सादर करण्यात आलेली होती.

४) कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या माहितीनुसार, संबंधितांचे गोपनीय अहवाल व प्रमाण संहिता नियम १९८४ कलम ३ (ii)(c) मधील तरतुदीला अनुसरुन विभागीय पदोन्नती समितीने श्री. अनिल बाबुराव जाधव यांचे कक्ष अधिकारी या पदाचे अनुभव विचारात घेऊन त्यांना सहायक कुलसचिव या पदाचे पदोन्नती देणेबाबत शिफारस केलेली होती व त्यास अनुसरुन कार्यालयीन आदेश क्र. SOL/SUS/Estt/२०११-१२/८०५०, दि.१६/१२/२०११ अन्वये पदोन्नती आदेश निर्गमित करण्यात आला व त्यास अनुसरुन श्री. अनिल बाबुराव जाधव हे दि.१७/१२/२०११ रोजी मध्यान्हपुर्व सहायक कुलसचिव या पदावर रूजू झाले होते.

५) सामान्य प्रशासन विभागाचे दि.२५/०२/२००५ रोजीचे शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२००५/ प्र.क्र.१/२००५/१२ मध्ये गट अ मधील सर्व टप्प्यापर्यंतच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर तीन वर्षाच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून राहील. असे नमूद आहे.

६) वरीलप्रमाणे दि.२५/०२/२००५ रोजीचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दि.२२/११/२०११ रोजी संपन्न झालेल्या विभागीय पदोन्नती समितीसमोर सादर केले असता विभागीय पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे उपरोक्त परिपत्रक बंधनकारक असल्याचे नमूद केलेले आहे. तरी सदर शासन परिपत्रक दि.२१/०७/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करुन श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम यांचे अनुभव ग्राहय न धरता श्री. अनिल बाबुराव जाधव यांना सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती दिल्याचे दिसून येते.

७) सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त शासन निर्णयामध्ये गट अ मधील पदोन्नतीकरीता निकटतम पदाचा तीन वर्षाचा अनुभव ग्राहय धरणेबाबत नमूद असताना सदरची बाब दि.२१/०७/२०११ च्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. ०८ अन्वये अमान्य केलेली दिसून येते. वास्तविक पाहता, शासनाकडून निर्गमित करण्यात येणारे सर्व शासन निर्णय हे सर्वांवर बंधनकारक असताना उक्तप्रमाणे व्यवस्थापन परिषदेने शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी दिलेली नसल्याचे दिसून येते.

८) वास्तविक पाहता विभागीय पदोन्नती समितीने सहायक कुलसचिव या पदाच्या पदोन्नतीकरीता महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदाच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ मधील तरतुदीनुसार कक्ष अधिकारी या पदाचे ५ वर्षाचे अनुभव ग्राहय धरुन श्री. अनिल बाबुराव जाधव यांना दि.१६/१२/२०११ रोजी सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती दिलेली आहे. तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. २०/०५/२०१० रोजीच्या शासन निर्णयामध्ये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदाच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ रद्द झाल्याचे व व त्याऐवजी सामायिक परिनियम (Common Statutes) लागू होईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात येत असल्याचे नमूद आहे. सदर बाब विचारात घेता, श्री. अनिल बाबुराव जाधव यांना प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदाच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ मधील अनुभवाची अट ग्राहय धरण्यात आलेली आहे. तथापि, त्यांना सहायक कुलसचिव या पदावरील पदोन्नती देण्यात आलेल्या कालावधीत महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदाच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ ही रद्द झालेली होती. असे असतानाही विभागीय पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासनाच्या दि.२५/०२/२००५ व २०/०५/२०१० रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता श्री.अनिल बाबुराव जाधव यांना सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती दिल्याचे दिसून येते.

९) श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम यांना अधिक्षक पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त पदावर विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार कार्यालयीन आदेश क्र. SOL/UTY/२०९, दि.२८/०६/२००७ अन्वये अधिक्षक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असून सदर पदावर श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे दि. २८/०६/२००७ रोजी कार्यालयीन वेळेत रुजू झाले आहेत. तर श्री. अनिल बाबुराव जाधव यांची अधिक्षक या पदावर सरळसेवा भरतीने झालेली असून त्यांना नियुक्ती आदेश क्र. SOL/UTY/ESTT/७७९८-०७, दि.२१/१०/२००८ अन्वये अधिक्षक

या पदावर नियुक्ती करण्यात आलेली असून सदर पदावर श्री. अनिल बाबुराव जाधव हे दि.०२/१२/२००८ रोजी कार्यालयीन वेळेत रूजू झाले आहेत. सदर दोन्ही बाबींचा विचारा करता श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्यापेक्षा श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे वरिष्ठ असल्याचे दिसून येते.

१०) प्रस्तुत विद्यापीठाच्या ०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० व ०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीतील कक्ष अधिकारी या पदाची सेवाजेष्ठता यादी अवलोकनी घेता, सेवाजेष्ठतेमध्ये श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्यापेक्षा वरिष्ठ होते व तशी यादीमध्ये दर्शविण्यात आलेले आहे. म्हणजेच सदर दोन्ही वर्षाच्या सेवाजेष्ठता यादीनुसार श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्यापेक्षा श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे वरिष्ठ आहेत. सदरबाबत श्री. अनिल बाबुराव जाधव यांचेकडून कोणत्याही प्रकारचे आक्षेप नोंदविण्यात आलेली नाही. असे असतानाही श्री. अनिल बाबुराव जाधव यांना सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती देण्यात आल्याचे दिसून येते.

११) उक्त बाबींचा विचार करुन मा. प्रधान महालेखाकार कार्यालय, पुणे यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठाचे ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१७ या कालावधीचे करण्यात आलेल्या लेखा परिक्षण अहवालामध्ये मुद्दा क्र. ५ नुसार श्री. ज्ञानदेव सिताराम कांबळे हे प्रस्तुत विद्यापीठामध्ये कक्ष अधिकारी या पदाच्या सेवा जेष्ठता यादीमध्ये वरिष्ठ असताना तसेच पदोन्नती करीता प्रवर्गनिहाय उपलब्ध असलेल्या पदसंख्येनुसार श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे अनुसुचित जाती (SC) प्रवार्गातून येत असताना त्यांना पदोन्नती देण्याऐवजी भटक्या विमुक्त जाती (VJNT) प्रवार्गातून येणाऱ्या श्री. अनिल बाबुराव जाधव यांना सहायक कुलसचिव या पदावर खूल्या प्रवर्गातून देण्यात आलेल्या पदोन्नतीवर आक्षेप घेतलेला आहे.

१२) उपरोक्तप्रमाणे श्री. अनिल बाबुराव जाधव यांना सहायक कुलसचिव या पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीस अनुसरुन प्रधान महालेखाकार कार्यालय, पुणे यांचेकडून उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपाबाबत श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्या पदोन्नतीची बाब व्यवस्थापन परिषदेसमोर फेरविचारार्थ सादर करण्यात येणार असल्याचे प्रधान महालेखाकार कार्यालय, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

१३) उपरोक्त बाबीस अनुसरुन श्री. अनिल बाबुराव जाधव यांना देण्यात आलेली पदोन्नतीची बाब दि. २६/०२/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर विषय क्रमांक ८(१) अन्वये सादर करण्यात आला असता, खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

ठराव: सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करावा असे ठरले.

१४) व्यवस्थापन परिषदेने केलेल्या उपरोक्त ठरावास अनुसरुन सदरचा विषय दि.२०/०७/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. ०८ अन्वये फेरसादर करण्यात आला असता, खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

ठराव: श्री. अनिल बाबुराव जाधव यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहा. कुलसचिव या पदावर सेवाजेष्ठता व शासन निर्णय डावलून दिलेल्या पदोन्नतीबाबत, कायदेशीर अभिप्राय घेऊन सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे ठरले.

१५) उपरोक्तप्रमाणे झालेल्या ठरावास अनुसरुन सदरचे प्रकरण अभिप्रायाकरीता कायदा विभागाकडे सादर करण्यात आला असता, कायदा विभागाने ॲड एस. व्ही. उजळंबे यांचा अभिप्राय घेऊन या कार्यालयास दि.१८/१२/२०२० रोजी सादर केलेला असून त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

i) श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम हे अधिक्षक म्हणून असलेली सेवा श्री. अनिल बाबुराव जाधव यांचेपेक्ष जास्त कालावधीचा आहे. त्यामुळे त्यांचे नाव सेवाजेष्ठता यादीमध्ये श्री. अनिल बाबुराव जाधव यांचेपेक्षा वर आहे. श्री. अनिल बाबुराव जाधव हे जरी शिवाजी विद्यापीठात "कक्ष अधिकारी" म्हणून कार्यरत असले तरी, त्यांची नियुक्ती दि.०२/१२/२००८ रोजी सरळसेवा भरतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे दि.२५/०२/२००५ रोजीचे शासन निर्णयाप्रमाणे "गट अ" मधील सर्व टप्प्यापर्यंतचा आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निम्नत्तम निम्न पदावर तीन वर्षाच्या किमान सेवेची अट, पदोन्नती साठीची पूर्व अट राहील, असे नमूद आहे. सदर शासन निर्णयचा विचार विभागीय पदोन्नती समितीने घेतलेला दिसून येत नाही. श्री. अनिल बाबुराव जाधव यांची विद्यापीठास अधिक्षक/कक्ष अधिकारी म्हणून वरील शासन निर्णयाप्रमाणे गट अ टप्प्यावर आंतरश्रेणी पदोन्नती करतांना तीन वर्षापेक्षा कमी कालावधीची सेवा झालेली आहे, असे दिसून येते.

श्री. डी. एस. कांबळे हे विद्यापीठामध्ये कक्ष अधिकारी/अधिक्षक या पदाच्या सेवा जेष्ठता यादीमध्ये वरिष्ठ असताना तसेच त्यांची पदोन्नती प्रवर्गनिहाय अनुसूचित जातीसाठी १ उपलब्ध असताना त्यांना पदोन्नती न देता विमुक्त जाती प्रवर्गातून सरळ भरतीने येणारे श्री.अनिल बाबुराव जाधव यांना "सहायक कुलसचिव पदावर" खुल्या प्रवर्गातून विभागीय पदोन्नती समितीने दि.२२/११/२०११ रोजीचा केलेला ठराव क्र. ८ अन्वये दिलेल्या पदोन्नतीचा आदेश कायद्यास धरुन नाही.

१६) श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्या पदोन्नतीसंदर्भात उक्त नमूदप्रमाणे कायदा विभागाकडून प्राप्त अभिप्राय दि.१५/०२/२०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्रमांक ४ अन्वये सादर करण्यात आला असता, व्यवस्थापन परिषदेने सदर प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे व सदर प्रकरणी प्राप्त कायदेशिर अभिप्राय विचारात घेऊन खालीलप्रमाणे ठराव केलेला आहे.

ठराव: दि. २२/११/२०११ रोजीच्या विभागीय पदोन्नती समितीने श्री. अनिल बाबुराव जाधव यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव या पदावर दिलेल्या पदोन्नतीस अनुसरुन कायदा विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिप्रायाची नोंद घेण्यात आली.

१७) श्री. कांबळे ज्ञानदेव सिताराम यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असून सदर पदावर ते दि. २४/०२/२०१२ पासून कार्यरत असून दि.३१/०५/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार सहायक कुलसचिव या पदावरुन विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत.

१८) सद्य:स्थितीत श्री. अनिल बाबुराव जाधव हे विद्यापीठ आस्थापनेवर सहायक कुलसचिव या पदावर कार्यरत आहेत.

१९) श्री. अनिल बाबुराव जाधव यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव या पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीबाबत मा. महालेखापाल यांनी लेखा परिक्षणामध्ये मुद्दा उपस्थित केलेला असल्याने त्यास अनुसरुन मा. महालेखापाल कार्यालयाकडे उत्तर अथवा कार्यवाही अहवाल सादर करावे लागणार आहे. तथापि, श्री. अनिल बाबुराव जाधव यांच्या पदोन्नतीसंदर्भात विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने दि.२६/०२/२०२०, दि.२०/०७/२०२० व दि.१५/०२/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये कोणताही ठोस ठराव केलेला नसून, सदर प्रकरणी ठोस ठराव करुन त्यानुसार उचित कार्यवाही करुन त्याबाबतचा कार्यवाही अहवाल मा.महालेखापाल कार्यालयास सादर करावे लागणार आहे.

सबब, श्री. अनिल बाबुराव जाधव यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव या पदावर दिलेल्या पदोन्नतीस अनुसरुन विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५/०२/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक ४ ला अनुसरुन झालेला ठराव फेरविचारार्थ सादर.

<table>
<tr><td>ठराव:</td><td>श्री. अनिल बाबुराव जाधव यांना कक्ष अधिकारी या पदावरुन सहायक कुलसचिव या पदावर दिलेल्या पदोन्नतीस अनुसरुन मा. महालेखापाल कार्यालय, मुंबई यांना खालीलप्रमाणे कळविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>१) श्री. अनिल बाबुराव जाधव यांना सन २०११ मध्ये दिलेली पदोन्नती ही विभागीय पदोन्नती समितीने (DPC) घेतलेल्या निर्णयानुसार देण्यात आलेली असून तद्नंतर श्री. ज्ञानदेव सिताराम कांबळे यांनाही २ महिन्यांत सहायक कुलसचिव पदी पदोन्नती देण्यात आली असून सन २०१७ मध्ये ते सेवानिवृत्त झालेले आहेत.<br>२) यापुढे वर्ग १ ते ४ मधील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देताना प्रशासनाकडून काटेकोरपणे नियमांचे पालन व अभ्यास करुन पदोन्नती देण्याची कार्यवाही करावी अशा सूचना प्रशासनास देण्यात आल्या.</td></tr>
</table>

विषय क्र.४ सन २०२२-२३ च्या सुधारीत व २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

टिपणी: सन २०२२-२३ च्या सुधारीत व सन २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्प दि.३०/०१/२०२३ रोजीच्या वित्त व लेखा समितीने ठराव क्र.२ अन्वये व दि.०२ फेब्रुवारी, २०२३ च्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.३ अन्वये मान्यता देऊन अधिसभेस शिफारस केली आहे. सदरचा अर्थसंकल्प दि.१४/०३/२०२३ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या सभेत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सन २०२२-२३ च्या सुधारीत व २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | सन २०२२-२३ च्या सुधारीत व २०२३-२४ च्या मुळ अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्यासाठी वित्त व लेखा अधिकारी, सीए. श्रेणिक शहा यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.<br>पूर्वी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ नुसार, वित्त व लेखा अधिकारी हे अधिसभेचे निमंत्रित सदस्य होते, मात्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार वित्त व लेखा अधिकारी हे अधिसभेचे निमंत्रित नसून सदस्य असल्याने मुलभूतरित्या (by default) वित्त व लेखा अधिकारी यांनीच अर्थसंकल्प सादर करावा व त्यासाठी व्यवस्थापन परिषदेसमोर नामनिर्देशनासाठी येण्याची आवश्यकता नाही असे सर्वानुमते ठरले. तसेच काही अपवादात्मक परिस्थितीत वित्त व लेखा अधिकारी यांच्या अनुपस्थित अर्थसंकल्प सादर करण्यासाठी सदस्याचे नामनिर्देशन करण्यासाठी मा.कुलगुरु यांना सर्वाधिकार देण्याचेही सर्वानुमते ठरले. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय क्र.५ ऑक्टोंबर/ नोव्हेंबर २०२२ च्या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व सत्राच्या सर्व परीक्षा ऑफलाईन पध्दतीने ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणालिद्वारे होणार आहेत. सदर कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd. या गोपनीय फर्मने Typesetting & DTP केलेल्या प्रश्नपत्रिका Confederation of Indian Innovators and Incubators या गोपनीय फर्मने परीक्षा केंद्राना ऑनलाईन माध्यमाद्वारे गोपनीय पध्दतीने पाठविणे कामाचा दरकरार मसुद्यास व करार करण्यास मा.व्यवस्थापन परीषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही मा.व्यवस्थापन परीषदेच्या माहितीस्तव.

टिपणी: ऑक्टोंबर / नोव्हेंबर, २०२२ च्या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व सत्राच्या सर्व परीक्षा ऑफलाईन पध्दतीने ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणालिद्वारे होणार आहेत. सदर कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd. या गोपनीय फर्मने Typesetting & DTP केलेल्या प्रश्नपत्रिका Confederation of Indian Innovators and Incubators या गोपनीय फर्मने परीक्षा केंद्राना ऑनलाईन माध्यमाद्वारे गोपनीय पध्दतीने पाठविणे कामाचा दरकारार मसुदा तपासणीकरीता कायदा विभागास दि.१६/०१/२०२३ रोजीच्या अं.का.टि. अन्वये पाठविण्यात आला होता. सदर करारपत्र मसुद्यात कायदा अधिकारी यांनी बदल सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करुन सदरचा दर करार पत्राचा मसुदा तयार करण्यात आला होता. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३२ (झ) अन्वये करार करण्याचे अधिकार व्यवस्थापन परीषदेस आहेत. तथापि, परीक्षेचा कालावधी व त्यानुसार विहित वेळेत करार करणे क्रमप्राप्त व आवश्यक होते. त्यामुळे कालमर्यादा विचारात घेता तातडीची बाब म्हणुन सदर दरकरार पत्राच्या मसुद्यास व करारा करण्यास मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परीषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब व्यवस्थापन परीषदेच्या माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | ऑक्टोंबर/ नोव्हेंबर २०२२ च्या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व सत्राच्या सर्व परीक्षा ऑफलाईन पध्दतीने ऑनलाईन प्रश्नपत्रिका वितरण प्रणालिद्वारे होणार आहेत. सदर कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd. या गोपनीय फर्मने Typesetting & DTP केलेल्या प्रश्नपत्रिका Confederation of Indian Innovators and Incubators या गोपनीय फर्मने परीक्षा केंद्राना ऑनलाईन माध्यमाद्वारे गोपनीय पध्दतीने पाठविणे या कामाचा दरकरार मसुद्यास व करार करण्यास तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परीषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. |

विषय क्र.६ दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत बाब क्र.६(१) वगळून कायम करण्यात आला. बाब क्र.६(१) येथील ठराव खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**ठराव:** दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला.

पान क्र.७ वर आयत्या वेळेचा विषय क्र.६(१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

**पूर्वीचा ठराव**

शासनाच्या आरक्षण निर्देशांनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विविध संकुलांमध्ये खालीलप्रमाणे सात पदे भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | संकुलाचे नाव | पद | मंजूर पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | रसायनशास्त्र संकुल | प्राध्यापक | १ |
| | | सहयोगी प्राध्यापक | १ |
| २ | भूशास्त्र संकुल | प्राध्यापक | १ |
| | | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ३ | सामाजिकशास्त्रे संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ४ | संगणकशास्त्र संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ५ | भौतिकशास्त्र संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |

**दुरुस्त केलेला ठराव**

शासनाच्या आरक्षण निर्देशांनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विविध संकुलांमध्ये खालीलप्रमाणे सात पदे भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | संकुलाचे नाव | पद | मंजूर पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | रसायनशास्त्र संकुल | प्राध्यापक | १ |
| | | सहयोगी प्राध्यापक | १ |
| २ | भूशास्त्र संकुल | प्राध्यापक | १ |
| | | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ३ | सामाजिकशास्त्रे संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ४ | संगणकशास्त्र संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ५ | भौतिकशास्त्र संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |

मात्र, जाहिरात देण्यापूर्वी या विभागणीमध्ये काही बदल करावयाचा असल्यास याबाबतचे सर्वाधिकार मा. कुलगुरुंना देण्याचे सर्वानुमते ठरले.

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

विषय क्र. ७ (१) श्री. शरद शंकर पवार, ७१८ उत्तर सदर बझार, सोलापूर यांचे दि.१३/०२/२०२३ रोजीचे विनंती पत्र विचारार्थ.

टिपणी: उपरोक्त पत्रान्वये श्री. शरद पवार यांनी ते प्रस्तुत विद्यापीठात दि.०५/१२/२००८ रोजी त्यांची रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर नेमणूक करण्यात आली होती. तद्नंतर त्यांना दि.०४/०११/२००९ रोजीच्या आदेशान्वये कामावरुन बडतर्फ करण्यात आले होते. सदर आदेशाविरुध्द श्री. शरद शंकर पवार यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे येथे याचिका दाखल केली होती. सदर याचिकेला अनूसरुन विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे यांनी दि.१६/०९/२०१० रोजीच्या आदेशान्वये त्यांची मागील सेवा सलग धरुन मधल्या काळातील संपूर्ण पगार देवून पुर्ववत कामावर घेण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशाविरुध्द विद्यापीठाने मे. मुंबई उच्च न्यायालय येथे रीट पीटीशन क्र.९६७७/२०१० दाखल केले असता ॲडमिशन स्टेजला ते रद्द बातल झाले व तद्नंतर विद्यापीठाने मे.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर L.P.A.49/2011 Stamp/5410/2011 याचिका दाखल केली असून सदर याचिका सद्य:स्थितीत प्रलंबित आहे.

श्री. पवार यांनी त्यांचे वय ४३ असून त्यांची पत्नी व दोन मुली या त्यांच्यावर अवलंबून असल्याने उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्याने सद्य: परिस्थितीत अतिशय हलाखीत व अडचणीचे जीवन जगत असल्याने व इतर बाबी नमूद केल्या असून त्यांनी त्यांची सेवा सलग धरुन पूर्वलक्षी प्रभावाने कायम करुन त्याप्रमाणे पगार निश्चित करण्याचे तसेच दप्तरी विभाग स्थापन करुन सदर विभागात पूर्ववत कामावर घेण्याचे तसेच सदर काळातील (Back Wages) पगाराचा हक्क सोडून मेहरबान मुंबई उच्च न्यायालयात तडजोड करण्याचे उपरोक्त पत्रान्वये कळविले आहे.

सबब, श्री. शरद शंकर पवार, ७१८ उत्तर सदर बझार, सोलापूर यांचे दि.१३/०२/२०२३ रोजीचे विनंती पत्र विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | श्री. शरद शंकर पवार, ७१८ उत्तर सदर बझार, सोलापूर यांनी दि.१३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये केलेली विनंती खालील अटींच्या अधिन राहून सर्वानुमते मान्य करण्यात आली.<br>१) श्री. शरद शंकर पवार यांना देण्यात आलेल्या दि.०५/१२/२००८ रोजीच्या आदेशानुसार Record Keeper Cum Clerk या पदावर रुजू करुन घेणे.<br>२) श्री. शरद शंकर पवार यांची सेवा पूर्वलक्षी प्रभावाने विचारात घेण्यात येवून वेतन निश्चितीबाबतचा प्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. |

| | |
|---|---|
| | ३) या व्यतिरिक्त दि.०४/११/२००९ पासून ते सेवेत रुजू होणाच्या तारखेपर्यंत इतर कोणतेही मागील आर्थिक लाभ त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने मिळणार नाहीत व भविष्यात त्याबाबत त्यांनी मागणी व तक्रार उपस्थित करु नये.<br>४) श्री. शरद शंकर पवार यांनी Back Wages चे हक्क सोडून सेवेत रुजू होण्याबाबत केलेली विनंती मान्य करण्यात आली.<br>५) श्री. शरद शंकर पवार यांनी रुजू होताना हमीपत्र सादर करावे.<br>६) वरीलप्रमाणे कार्यवाही श्री. शरद शंकर पवार यांनी मान्य केल्यास याबाबत त्यांच्या विरुध्द प्रलंबित याचिका क्र. LPA No.४९/२०११ निकाली काढण्यास विद्यापीठ तयार असल्याबाबतची बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याबाबत विद्यापीठ नियुक्त वकीलांना कळविण्यात यावे. |

| | |
|---|---|
| विषय क्र. ७ (२) | **श्री. सचिन श्रीशैल पोतदार, आर / ओ ब्लॉक नं.३७ / बी, रामा निवास, रामलिंग नगर, विजापूर रोड, सोलापूर यांचे दि.२३/०२/२०२३ रोजीचे विनंती पत्र विचारार्थ.** |

टिपणी: उपरोक्त पत्रान्वये श्री. सचिन श्रीशैल पोतदार यांची प्रस्तुत विद्यापीठात दि.०२/०९/२००८ रोजी लघुटंकलेखक या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर त्यांना दि.०४/११/२००९ रोजीच्या आदेशान्वये कामावरुन बडतर्फ करण्यात आले होते. सदर आदेशाविरुध्द श्री. पोतदार यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे येथे अपील क्र.०६/२०१० याचिका दाखल केली होती. सदर याचिकेला अनूसरुन विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे यांनी दि.१६/०९/२०१० रोजीच्या आदेशान्वये त्यांची मागील सेवा सलग धरुन संपूर्ण पगार देवून पुर्ववत कामावर घेण्याचे आदेश दिले होते. सदर आदेशाविरुध्द विद्यापीठाने मे. मुंबई उच्च न्यायालय येथे रीट पीटीशन क्र.९६७८/२०१० दाखल केले असता ॲडमिशन स्टेजला ते रद्द बातल झाले व तद्नंतर विद्यापीठाने मे. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर L.P.A.५०/२०११ याचिका दाखल केली असून सदर याचिका सद्य:स्थितीत प्रलंबित आहे.

श्री. सचिन श्रीशैल पोतदार यांनी दि.१६/०२/२०२३ रोजीच्या LPA च्या सुनावणीमध्ये तडजोड संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. श्री. पोतदार यांनी दि.०४/०१/२००९ ते दि.०५/०१/२०१२ या कालावधीचा संपूर्ण पगार वार्षिक वेतनवाढीसह देवून प्रथम दिनांकापासून (दि.०२/०९/२००८) पासूनची सेवा गृहित धरुन प्रचलित शासन निर्णय व सेवा नियमानुसार त्यांना कायदेशीर देय रकमा आदा केल्यास ते त्यांचा लघुटंकलेखक या पदावरील हक्क कायमस्वरुपी सोडून देण्यास तयार असून याबाबत मे. उच्च न्यायालय, मुंबई येथे तडजोड करण्यास तयार असल्याचे उपरोक्त पत्रान्वये कळविले आहे.

सबब, श्री. सचिन श्रीशैल पोतदार, आर/ओ ब्लॉक नं.३७/बी, रामा निवास, रामलिंग नगर, विजापूर रोड, सोलापूर यांचे दि.२३/०२/२०२३ रोजीचे विनंती पत्र विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **श्री. सचिन श्रीशैल पोतदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये दि.०४/०१/२००९ ते दि.०५/०१/२०१२ या कालावधीतील संपूर्ण पगार वार्षिक वेतन वाढीसह दिल्यास व नियुक्ती दिनांकापासूनची सेवा गृहीत धरुन प्रचलित शासन निर्णयानुसार व सेवानियमानुसार कायदेशीर देय रकमा अदा केल्यास प्रस्तुत विद्यापीठात त्यांच्या नोकरीसंबंधी कायम स्वरुपी हक्क सोडण्यास तयार असल्याबाबत नमूद केलेले आहे. सदर कालावधीत म्हणजेच दि.०४/०१/२००९ ते ०५/०१/२०१२ मध्ये ते विद्यापीठाच्या सेवेत नव्हते. त्यामुळे त्यांनी सदर कालावधीतील सर्व फायदे आणि वेतन मिळण्याबाबत केलेली मागणी उचित नाही, असे श्री. सचिन श्रीशैल पोतदार यांना कळवावे असे सर्वानुमते ठरले.** |

**विषय क्र. ७ (३)** **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दिनांक १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरू महोदयांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि.१५/०९/२०१७ च्या शासन निर्णयात नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी विविध संस्थाकडून दिनांक ३० सप्टेंबर पूर्वी प्रस्ताव मागविण्यात यावे अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ ग अन्वये " विहित केलेल्या उपरोक्त कालमर्यादेत प्राप्त झालेल्या अशा सर्व अर्जांची अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज ज्यावर्षी असा अर्ज विद्यापीठाला प्राप्त झाला असेल त्या वर्षाच्या ३० नोव्हेंबर किंवा त्यापूर्वी, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील. विद्यापीठ अर्जासोबत व्यवस्थापन परिषदेला उचित वाटतील त्याप्रमाणे, संबध्द कारणांनी यथोचितरित्या पुष्टी दिलेल्या आपल्या शिफारशी सादर करील" अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३- २४ साठी प्रस्तावित नवीन दोन महाविद्यालयांसाठी प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्याची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार छाननी समितीची व तज्ज्ञ समितीची (Spot Visit) कार्यवाही पुर्ण झालेली आहे. तद्नंतर अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करावयाची कार्यवाही व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, दि.२४/११/२०२२ रोजीच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश २०२२ मध्ये सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी २८ फेब्रुवारी २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी शासनास सादर करावेत असे आदेशित केलेले आहे. अधिष्ठाता मंडळाकडून छाननी करण्यासाठी व सदरच्या कार्यवाहीस व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यासाठी बराच कालावधी लागणार आहे. यास्तव वेळेअभावी तातडीची बाब असल्याने अधिष्ठाता मंडळाच्या व व्यवस्थापन परिषदेच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात प्राप्त पात्र दोन प्रस्ताव शासनास सादर करण्यास दि.२८/०२/२०२३ रोजीच्या टिपणीअन्वये मान्यता दिलेली आहे.)

सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरू महोदयांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांवर दिनांक १५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करणेसंदर्भात तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

विषय क्र. ७ (४) **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क विहित मुदतीनंतर प्राप्त झाल्याने प्रतिमहा रु.१,०००/- दंड स्वीकारण्यास मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**

टिपणी: मा. प्र. प्राचार्य, दिपकआबा साळुंखे-पाटील महाविद्यालय, कोळे यांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिताचे वार्षिक संलग्निकरण शुल्क परिपत्रकानुसार विद्यापीठाकडे भरणा करण्याचे नजरचुकीने राहून गेले असल्याने सदरील शुल्क दंडासहित भरण्यास तयार असल्याचे कळविले होते.

त्यांस अनुसरुन प्रस्तुत विभागाकडून दि.०१/१२/२०२२ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. सदरील टिपणीमध्ये संलग्निकरणाचे नुतनीकरण प्रस्तावास विहित मुदतीनंतर प्रतिमाह रु.१,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येतो. याच धर्तीवर वार्षिक संलग्निकरण शुल्क विहित मुदतीनंतर प्राप्त झाल्याने विहित मुदतीनंतरच्या प्रतिमहा रु.१,०००/- प्रमाणे दंड आकारुन दिपकआबा साळुंखे-पाटील महाविद्यालय, कोळे या महाविद्यालयाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क भरुन घेण्यास तसेच भविष्यात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिताचे वार्षिक संलग्निकरण शुल्क न भरणाऱ्या महाविद्यालयांसही याच पध्दतीने दंडाची रक्कम आकारण्यासंदर्भात नमूद करण्यात आले होते. तद्नंतर सदर प्रकरणी दि.१९/१२/२०२२ रोजी कार्यालयीन टिपणी फेरसादर करण्यात आली होती. त्याअनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७३ (३) व ७४ मधील तरतुदीनुसार मा. अधिष्ठाता मंडळाची व विहित कार्यवाही करुन व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत प्राधिकरणाच्या बैठका नियोजित नसल्याने व संबंधित महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिताचे वार्षिक संलग्निकरण शुल्क भरुन घेणे आवश्यक असल्याने (शुल्क भरुन न घेतल्यास महाविद्यालयाचा दरमहा दंड वाढत जाईल.) तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता मंडळ व व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाविद्यालयाकडून दंडासह वार्षिक संलग्निकरण शुल्क स्वीकारण्यात आलेले आहे.

सदरची बाब दि.१०/०१/२०२३ रोजीच्या मा. अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत माहितीस्तव सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

"प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क विहित मुदतीनंतर प्राप्त झाल्याने प्रतिमाह रु.१,०००/- दंड स्वीकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदय यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली."

सदर प्रकरणी अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत झालेला ठराव माहितीस्तव.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क विहित मुदतीनंतर प्राप्त झाल्याने प्रतिमहा रु.१,०००/- दंड स्वीकारण्यास मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

| | |
|---|---|
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून विविध अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्निकरण शुल्क विहित मुदतीनंतर प्राप्त झाल्याने प्रतिमहा रु.१,०००/- दंड स्वीकारण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) नुसार मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेल्या बाबीची नोंद घेण्यात आली.** |

मा.कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद